आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१९ मे २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर ९० पैसे वाढ

- पाच देशांच्या दौऱ्याच्या चौथ्या टप्प्यात प्रधानमंत्री आज भारत-नॉर्डिक शिखर परिषदेत सहभागी होणार

- भटक्या कुत्र्यांना लसीकरण किंवा निर्बीजीकरणानंतर सोडून द्यावं ही मागणी सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली

**आणि**

- माजी केंद्रीय मंत्री आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भुवनचंद्र खांडुरी यांचं निधन

**<><><><><>**

पेट्रोल आणि डिझेलच्या दरात आज प्रति लिटर ९० पैसे वाढ झाली. एका आठवड्यापेक्षा कमी कालावधीतली ही दुसरी दरवाढ आहे. दिल्लीमध्ये आता पेट्रोलचा दर ९८ रुपये ६४ पैसे, तर डिझेल ९१ रुपये ५८ पैसे, झाला आहे, तर मुंबईत पेट्रोल १०७ रुपये ५९ पैसे दराने आणि डिझेल ९४ रुपये ८ पैसे दराने मिळत आहे.

अमेरिका आणि इस्राएलनं इराणमध्ये छेडलेला संघर्ष आणि त्यामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या तेल वाहतुकीत आलेला व्यत्यय, यामुळे जगभरात कच्च्या तेलाच्या किमतीने उसळी घेतल्याच्या पार्श्वभूमीवर ही दरवाढ झाली.

**<><><><><>**

पेट्रोल आणि डिझेलच्या दरात ९० पैसे वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. सरकार जनतेची लूट करत असून विशिष्ट उद्योगपतींनाच सूट देत आहे असा आरोप त्यांनी केला. जनतेला काटकसरीचा सल्ला देऊन सरकार जनतेवर महागाईचा भार टाकत आहे, अशी टीका खरगे यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात केली.

इंधन दरवाढीवर विरोधी पक्षाकडून टीका सुरू असताना भाजपाने या वाढीचं समर्थन केलं असून ही दरवाढ इतर देशांपेक्षा कमी आहे, असं म्हटलं आहे. इंधन दरवाढीचा फटका

जगातल्या सर्वच देशांना बसला आहे, तरीही भारतात इंधन दरात केवळ चार टक्के वाढ झाली आहे, असं भाजपाच्या आयटी विभागाचे प्रमुख अमित मालवीय यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

आखाती संकटानंतर इंधन बचत, परकीय चलनाचं रक्षण आणि स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देण्यासाठी एकसंध होण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. यासंदर्भात त्यांनी सामाजिक माध्यमावर एक व्हिडिओ जारी केला आहे. जागतिक आव्हानांचा सामना करण्यासाठी राष्ट्रप्रथम या भावनेने सर्व नागरिकांना एका राष्ट्रीय अभियानात सहभागी होण्याचे आवाहन करताना मुख्यमंत्री म्हणाले:

बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सध्या पाच देशांच्या दौऱ्यावर असून, दौऱ्याच्या चौथ्या टप्प्यात ते आज  भारत-नॉर्डिक शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. तंत्रज्ञान, नवीकरणीय ऊर्जा, संरक्षण, शाश्वतता आणि व्यापार यासारख्या क्षेत्रांमध्ये नॉर्डिक राष्ट्रांबरोबरची भारताची धोरणात्मक भागीदारी अधिक बळकट करणं, हे या परिषदेचं उद्दिष्ट आहे.

प्रधानमंत्री मोदी यांनी काल भारत-नॉर्वे व्यापार आणि संशोधन परिषदेत दोन्ही देशांच्या अग्रगण्य उद्योगपती आणि संशोधकांना संबोधित केलं. उभय देशांमधले ऐतिहासिक आर्थिक संबंध नव्या उंचीवर नेण्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला. २०३० पर्यंत भारताने ५ हजार गिगावॅट स्वच्छ ऊर्जा निर्मितीचं उद्दिष्ट ठेवलं असून नॉर्वेनं यासाठी सहकार्य करावं असं प्रधानमंत्री म्हणाले.

-   - - **होल्ड -बाईट- मोदी** - - -

त्याआधी प्रधानमंत्र्यांनी नॉर्वेचे प्रधानमंत्री जोनास गहर स्टोर यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावर चर्चा केली. प्रधानममंत्री मोदी यांना नॉर्वेचा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'ग्रँड क्रॉस ऑफ द रॉयल नॉर्वेजियन ऑर्डर ऑफ मेरिट' काल प्रदान करण्यात आला. नॉर्वेचे महाराज राजे हेराल्ड पाचवे यांनी एका विशेष सोहळ्यात त्यांना हा सन्मान प्रदान केला.

दरम्यान, आपल्या दौऱ्याच्या पाचव्या टप्प्यात प्रधानमंत्री मोदी आज इटलीला रवाना होतील. इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांच्याशी ते द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

<><><><><>

देशातली सर्व प्रकारची न्यायाधिकरणं आणि समन्यायिक संस्थांचं कामकाज अखंडितपणे सुरू राहावं यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आज न्यायाधिकरण आणि समन्यायिक संस्थांचे अध्यक्ष, सभापती आणि सदस्यांचा कालावधी ८ सप्टेंबर पर्यंत वाढवला. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या एका सदस्याने या संदर्भात दाखल केलेल्या प्रलंबित खटल्यात सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत, जॉयमाल्य बागची आणि विपुल पांचोली यांच्या पीठाने हा आदेश दिला. केंद्राच्या वतीने ॲटर्नी जनरल आर. व्यंकटरमणी यांनी या मुदतवाढीला सहमती दर्शवली. नियुक्ती आणि मुदतवाढीवर विचारविनिमय करण्यासाठी निवड समितीची बैठक ८ सप्टेंबर रोजी होणार असल्याचं पीठाने यावेळी नमूद केलं.

<><><><><>

सार्वजनिक ठिकाणी पकडलेल्या भटक्या कुत्र्यांना लसीकरण किंवा निर्बीजीकरणानंतर पुन्हा सोडून दिलं जाऊ नये, हा यापूर्वी दिलेला आपला आदेश मागे घ्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज नकार दिला. नोव्हेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायलयाने दिलेल्या या आदेशात सुधारणा करण्याची मागणी करणाऱ्या याचिका न्यायमूर्ती विक्रम नाथ यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठानं फेटाळल्या आणि अशा कुत्र्यांना निवारा केंद्रांमध्येच ठेवण्याचे निर्देश दिले.

भटक्या कुत्र्यांनी यापूर्वी लहान मुलं, वृद्ध व्यक्ती आणि पादचाऱ्यांवर हल्ले केले असून, ही गंभीर समस्या आता विमानतळ आणि निवासी संकुलांपर्यंत पोहोचल्याचं न्यायालयानं नमूद केलं, आणि आपल्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांना अवमान आणि शिस्तभंगाच्या कारवाईला सामोरं जावं लागेल, असा इशारा दिला.

रेबीज किंवा दुर्धर आजाराने ग्रस्त श्वानांना दया मरण देण्याची परवानगी देखील न्यायालयाने दिली.

<><><><><>

७० कोटी रुपयांच्या आर्थिक घोटाळ्यात भोंदूबाबा अशोक खरात याला अटक करण्याची मुभा मुंबईतल्या पीएमएलए न्यायालयाने आज सक्तवसुली संचालनालयाला दिली. लैंगिक अत्याचार आणि फसवणूक, खंडणी वसुली प्रकरणात अशोक खरात याला यापूर्वीच

विविध गुन्ह्यांप्रकरणी न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे. आता ईडीकडूनही त्याला अटक होणार आहे. खरात हा एका मोठ्या खंडणी रॅकेटचा सूत्रधार असल्याचा आणि 'बेनामी' बँक खात्यांच्या माध्यमातून ७० कोटींहून अधिक रुपयांचा आर्थिक घोटाळा केल्याचा आरोप ईडीने केला आहे.

<><><><><>

नवी मुंबई विमानतळाचं नामांतर करण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी केंद्र सरकारला कालमर्यादा घालून द्यावी, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने आज फेटाळून लावली. केंद्राला कालमर्यादा घालून देणं हे केंद्र सरकारच्या धोरणनिर्मिती प्रक्रियेत हस्तक्षेप केल्यासारखं होईल, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या पीठाने म्हटलं आहे. विमानतळाचं नामकरण करणं हे न्यायालयाचं काम आहे का असा प्रश्न न्यायालायनं याचिकाकर्त्यांना विचारला. तसंच याचिकाकर्त्यांनी हे प्रकरण सक्षम प्राधिकरणासमोर न्यावं असं सांगितलं.

<><><><><>

माजी केंद्रीय मंत्री आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भुवनचंद्र खांडुरी यांचं आज देहराडून इथं प्रदीर्घ आजारानंतर निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. १९५४ मधे लष्करात दाखल होऊन ते १९९१ मधे मेजर जनरल पदावरुन निवृत्त झाले. १९८३ मधे त्यांना अतिविशिष्ट सेवा पदकाने सन्मानित करण्यात आलं होतं. त्यानंतर त्यांनी राजकारणात प्रवेश करत गढवाल मतदारसंघाचं लोकसभेत प्रतिनिधित्व केलं. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग खात्याचं मंत्रीपद त्यांनी सांभाळलं. राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारच्या काळातला सुवर्ण चतुष्कोण प्रकल्प त्यांच्या कार्यकाळात साकार झाला. २००७ ते २००९ आणि २०११ ते २०१२ असे दोन वेळा ते उत्तराखंडचे मुख्यमंत्री होते.

<><><><><>

नीट पेपरफुटी प्रकरणातले आरोपी शिवराज मोटेगावकर आणि पी. व्ही. कुलकर्णी यांच्या विरोधात आज लातूरमध्ये मनसेच्या वतीने निदर्शनं करण्यात आली. यावेळी आंदोलनकर्त्यांनी मोटेगावरकर याच्या क्लाससमोर अंडी फेकली. मोटेगावकर याच्या केंद्रातल्या विद्यार्थ्यांनी भरलेलं शुल्क त्यांना परत द्यावं, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१९ मे २०२६ - मंगळवार

**<><><><><>**

राज्यातल्या औषध विक्रेता संघानं विविध मागण्यांसाठी उद्या 'एक दिवसीय बंद' पुकारल्याच्या पार्श्वभूमीवर, रुग्णांची गैरसोय  होऊ नये, यासाठी  नांदेड इथल्या औषध आणि अन्न-प्रशासन सहाय्यक आयुक्त कार्यालयानं जिल्हा स्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन केला आहे.  नियंत्रण कक्षासाठी सहाय्यक आयुक्त, आणि अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची नियुक्ती केली असून, नागरिकांनी बंदच्या काळात अत्यावश्यक औषधांसाठी त्यांच्याशी संपर्क साधावा, तसंच संभाव्य गैरसोय टाळण्यासाठी आवश्यक औषधांची आगाऊ खरेदी करावी, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

**//<><><><><>//**